# NOTIFICATION

Home Department,
Mantralaya, Mumbai. 400032.
Date: 9th December 2011.

Constitution of India

**No: - MCT -0611/673/CR-201/TRA-5 Whereas** Motor Accident Claims Tribunals have been constituted in the State of Maharashtra under section-165 of the Motor Vehicles Act, 1988; AND WHEREAS the continuous flow of accident claims, inspite of the best efforts put in by the Motor Accident Claims Tribunals, the pendency of the claims have not been reduced substantially;

**AND Whereas** the object of establishing claims Tribunals under the Motor Vehicles Act, 1988 will not be achieved unless the Motor Accident Claims are disposed off expeditiously by evolving some mechanism by implementing the scheme of Evening Tribunals for disposal of motor accident claims in the State of Maharashtra.

**AND Whereas** it is expedient to frame appropriate rules with a view to ensure smooth functioning of such Evening Tribunals;

**NOW Therefore,** in exercise of the powers conferred by the Proviso to Articles 309, read with Articles 277 and 235 of the Constitution of India and of all other powers enabling it in this behalf, the Governor of Maharashtra in consultation with the High Court Bombay, hereby make the following rules for introduction and implementation of the scheme of Evening Motor Accident Claims Tribunals in the State of Maharashtra, namely: -

1. **Short Titles**: - These rules may be called the Maharashtra Evening Motor Accident Claims Tribunals Rules, 2011.

2. **Definitions:**- in these rules, unless the context otherwise requires;

   a. **"Chairman"** means the chairman of the Motor Accident Claims Tribunal and the District judge, who is designated as a Member of Motor Accident Claims Tribunal in exercise of the power under Section 165 of the Motor Vehicles Act, 1988;

   b. **" Evening Tribunal"** means the Tribunal as notified under rule-6 of these rules;

   c. **" Government"** means the Government of Maharashtra;

(2)

d. **" Member Evening Tribunal"** means any person appointed under rule 4 of these rules, to preside over the Evening Tribunal;

e. **" Member of Staff"** means any person or employee working in the Motor Accident Claims Tribunals;

f. **"Tribunal"** means The Motor Accident Claims Tribunal;

3. **Jurisdiction of Evening Tribunal-**

(1) The Evening Tribunal shall have jurisdiction in respect of claims under Section 140, 163/A and 166 of Motor Vehicles Act, 1988.

(2) The jurisdiction of Evening Tribunal shall be concurrent with the Motor Accident Claims Tribunal.

4. **Appointment of Presiding Officers of Evening Courts-**

(1) The High Court may appoint, depute or transfer any in-service judicial Officer including the Chairman and the Members of the Motor Accident Claims Tribunals and the District Judges designated as Members of Motor Accident Claims Tribunals in exercise of the powers under Section 165 of the Motor Vehicles Act, 1988, to work as the Presiding Officer of Evening Tribunals.

(2) The Government may, in consultation with the High Court, appoint any retired District Judge as Presiding Officer of Evening Tribunal, provided that no person shall act as a Presiding Officer of the Evening Tribunal after he has completed sixty five years of age.

5. **Appointment of Member of staff of Evening Tribunal-**

(1) The Chairman may appoint any serving member of the Staff to be a member of the staff of the Evening Tribunal.

(2) The Chairman may appoint any retired member of the staff to be a member of the staff of the Evening Tribunal.

(3) The number of staff shall not exceed three, which shall include one Sheristedar, one Stenographer (Higher Grade) and one Hawaldar for each Evening Tribunal.

(3)

6. **Notification of the Evening Tribunal:** - The High Court may, in consultation with the Government, notify the Tribunals to be the Evening Tribunals under these rules.

7. **Working Hours:** - All Evening Tribunals shall sit in the evening everyday except on holidays, ordinarily working hours of the Evening Tribunals shall be from 6.00 p.m. to 8.00 p.m.

Provided that the Chairman, Motor Accident Claims Tribunal, Mumbai shall consider all the attending circumstances and use his discretion in keeping the Evening Tribunal functional on working Saturday.

8. **Remuneration of the Presiding Officers of the Evening Tribunals and members of staff in the Evening Tribunals: -**

1) Where the in-service Judicial Officers are appointed to preside over the Evening Tribunals, they shall be paid twenty percent of his last drawn basic pay or an amount in the equivalent revised pay-scale, whichever is higher.
2) Every retired Judicial Officer, who has been appointed as the Presiding Officer of the Evening Tribunal, shall get twenty percent of his last drawn basic pay or an amount in the equivalent revised pay-scale, whichever is higher.
3) Every member of the staff appointed in the Evening Tribunal shall receive 20% of his basic pay.
4) Every retired member of the staff who has been appointed as member of staff of the Evening Tribunal shall get 20% of his last drawn basic pay.
5) Pay, allowance or honorarium payable to the Judicial Officers appointed to preside over the Evening Tribunals and the members of the staff shall be paid from the head "salary" of the concerned Motor Accident Claims Tribunals.

9. **Powers and duties of the Presiding Officers of Evening Tribunals:-**
Any person appointed as the Presiding Officer of the Evening Tribunal under rule 4 of these rules, shall be vested with powers to try the cases mentioned in rule 3 of these rules.

10. **Supervision and Control:-** Subject to the overall control of the High Court, the Chairman shall supervise and monitor the functioning of the Evening Tribunal.

11. **Conditions of the Service**: - Save as otherwise provided by these rules, the Presiding Officer of the Evening Tribunal appointed under Sub-rule (2) of rule 4 and member of the staff appointed under rule 5 to work in the Evening Tribunal shall be governed by the conditions as may be specified by the Government by order.

Provided that, the services of the Presiding Officer of the Evening Tribunals appointed under sub-rule (2) of rule (4) and member of staff appointed rule 5 to work in the Evening Tribunal may be terminated by the Appointing Authority at any time without notice and without assigning any reason and upon such termination he shall immediately cease to hold such office.

Provided further that, such termination of service shall not count adversely against that person in any manner.

11. **Savings**: - The law in force as applicable to the Motor Accident Claims Tribunal shall also be applicable to Evening Tribunals notified under these rules.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

(Dr. S. K. Sharma)
Principal Secretary

# अधिसूचना

गृह विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ९ डिसेंबर, २०११.

भारताचे संविधान

क्रमांक :- एमसीटी-०६११/६७३/प्र.क्र.२०१/परिवहन-५ ज्याअर्थी, मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम १६५ अन्वये, महाराष्ट्र राज्यात मोटार अपघात दावे न्यायाधिकरणे घटित करण्यात आली आहेत; आणि ज्याअर्थी, अपघात दाव्यांचा ओघ सातत्याने सुरु असल्यामुळे, मोटार अपघात दावे न्यायाधिकरणांनी चांगले प्रयत्न करुनसुध्दा, प्रलंबित दावे मोठया संख्येने कमी झालेले नाहीत;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यातील मोटार अपघात दावे निकालात काढण्यासाठी, सायंकालीन न्यायाधिकरणांच्या योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा निर्माण करुन मोटार अपघात दावे शीघ्र गतीने निकालात काढल्याखेरीज, मोटार वाहन अधिनियम, १९८८ अन्वये, दावे न्यायाधिकरणे स्थापन करण्याचे उद्दिष्ट गाठता येणार नाही.

आणि ज्याअर्थी, अशा सायंकालीन न्यायाधिकरणांचे कामकाज सुरळितपणे चालण्याची सुनिश्चिती करण्याच्या दृष्टीने, उचित नियम तयार करणे इष्ट आहे;

त्याअर्थी, आता, भारताचे संविधान याच्या अनुच्छेद ३०९ चे परंतुक, तसेच अनुच्छेद २७७ व २३५ यांव्दारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्राचे राज्यपाल, मुंबई उच्च न्यायालयाशी विचारविनिमय करुन, याव्दारे, महाराष्ट्र राज्यात सायंकालीन मोटार अपघात दावे न्यायाधिकरणांची योजना सुरु करण्यासाठी व तिची अंमलबजावणी करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत :-

१. संक्षिप्त नाव :- या नियमांना, महाराष्ट्र सायंकालीन मोटार अपघात दावे न्यायाधिकरण नियम, २०११ असे म्हणावे.

२. व्याख्या :- या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर;

क) "अध्यक्ष" याचा अर्थ, मोटार अपघात दावे न्यायाधिकरणाचा अध्यक्ष आणि मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम १६५ खालील अधिकारांचा वापर करुन, मोटार अपघात दावे न्यायाधिकरणाचा सदस्य म्हणून पदनिर्देशित केलेला जिल्हा न्यायाधीश, असा आहे;

ख) "सायंकालीन न्यायाधिकरण" याचा अर्थ, या नियमांच्या नियम ६ अन्वये अधिसूचित केलेले न्यायाधिकरण, असा आहे;

ग) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे.

घ) "सायंकालीन न्यायाधिकरणाचासदस्य" याचा अर्थ, सायंकालीन न्यायाधिकरणाचा अध्यक्ष होण्यासाठी, या नियमांच्या नियम ४ अन्वये नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती असा आहे;

ड.) "कर्मचारी" याचा अर्थ, मोटार अपघात दावे न्यायाधिकरणांमध्ये काम करणारी कोणतीही व्यक्ती किंवा कर्मचारी, असा आहे

फ) "न्यायाधिकरण" याचा अर्थ, मोटार अपघात दावे न्यायाधिकरण, असा आहे;

३. सायंकालीन न्यायाधिकरणाची अधिकारिता :-

१) सायंकालीन न्यायाधिकरणाला, मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १४०, १६३/क आणि १६६ अन्वये, दाव्यांच्या संबंधातील अधिकारिता असेल.

२) सायंकालीन न्यायाधिकरणाची अधिकारिता ही मोटार अपघात दावे न्यायाधिकरणाशी समवर्ती असेल.

४. सायंकालीन न्यायालयांच्या पीठासीन अधिकाऱ्यांची नियुक्ती :-

१) उच्च न्यायालयाला, सायंकालीन न्यायाधिकरणांचे पीठासीन अधिकारी म्हणून काम करण्यासाठी, मोटार अपघात दावे न्यायाधिकरणांचे अध्यक्ष व सदस्य यांच्यासहित सेवेत असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याची आणि मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १६५ खालील अधिकारांचा वापर करुन मोटार अपघात दावे न्यायाधिकरणांचे सदस्य म्हणून पदनिर्देशित केलेले जिल्हा न्यायाधीश यांची नियुक्ती, प्रतिनियुक्ती किंवा बदली करता येईल.

२) शासनाला, उच्च न्यायालयाशी विचारविनिमय करुन, सायंकालीन न्यायाधिकरणाचे पीठासीन अधिकारी म्हणून कोणत्याही सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीशाची नियुक्ती करता येईल.

(4)

परंतु, कोणतीही व्यक्ती, तिने वयाची पासष्ट वर्षे पूर्ण केल्यानंतर, सायंकालीन न्यायाधिकरणाचा पीठासीन अधिकारी म्हणून काम करणार नाही.

५. सायंकालीन न्यायाधिकरणाच्या कर्मचाऱ्याची नियुक्ती :-

१) अध्यक्षाला, सायंकालीन न्यायाधिकरणाचा कर्मचारी म्हणून, सेवेत असणाऱ्या कोणत्याही कर्मचाऱ्याची नियुक्ती करता येईल.

२) अध्यक्षाला, सायंकालीन न्यायाधिकरणाचा कर्मचारी म्हणून, सेवानिवृत्त झालेल्या कोणत्याही कर्मचाऱ्याची नियुक्ती करता येईल.

३) प्रत्येक सायंकालीन न्यायाधिकरणासाठी तीन पेक्षा अधिक नसेल एवढी कर्मचाऱ्यांची संख्या असेल, त्यामध्ये एक शिरस्तेदार, एक लघुलेखक (उच्चश्रेणी) व एक हवालदार यांचा समावेश असेल.

६. सायंकालीन न्यायाधिकरणाची अधिसूचना :-

उच्च न्यायालयाला, शासनाशी विचारविनिमय करुन, या नियमांन्वये सायंकालीन न्यायाधिकरणे म्हणून, न्यायाधिकरणे अधिसूचित करता येतील.

७. कामकाजाच्या वेळा :-

सर्व सायंकालीन न्यायाधिकरणे, सुटया वगळून प्रत्येक दिवशी संध्याकाळी भरतील. सायंकालीन न्यायाधिकरणांच्या कामकाजाच्या सर्वसाधारण वेळा सायंकाळी ६.०० ते रात्रौ ८.०० वाजेपर्यंत असतील :

परंतु, अध्यक्ष, मोटार अपघात दावे न्यायाधिकरण मुंबई हे, सायंकालीन न्यायाधिकरणाचे कामकाज शनिवारी सुरु ठेवण्यासंबंधात सर्व परिस्थितीचा विचार करतील आणि त्यांच्या स्वेच्छानिर्णयाचा वापर करतील.

८. सायंकालीन न्यायाधिकरणांच्या पीठसीन अधिकाऱ्यांचे आणि सायंकालीन न्यायाधिकरणांच्या कर्मचाऱ्यांचे पारिश्रमिक :-

१) सायंकालीन न्यायाधिकरणांच्या अध्यक्षपदी, जेथे सेवेतील न्यायिक अधिकाऱ्यांची नियुक्ती केली असेल तेथे, त्यांना, त्यांच्या शेवटच्या काढलेल्या मुळ वेतनाच्या वीस टक्के इतकी

किंवा सुधारित वेतनश्रेणीच्या सममूल्य असेल इतकी रक्कम, यापैकी जी अधिक असेल ती, देण्यात येईल.

२) सायंकालीन न्यायाधीकरणाचे पाठासीन अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेल्या प्रत्येक सेवानिवृत्त न्यायिक अधिकाऱ्याला, त्याच्या शेवटच्या काढलेल्या मुळ वेतनाच्या वीस टक्के इतकी किंवा सुधारित वेतनश्रेणीच्या सममूल्य असेल इतकी रक्कम, यापैकी जी अधिक असेल ती मिळेल.

३) सायंकालीन न्यायाधिकरणामध्ये नियुक्ती केलेल्या प्रत्येक कर्मचाऱ्याला, त्याच्या मूळ वेतनाच्या २० टक्के इतकी रक्कम मिळेल.

४) सायंकालीन न्यायाधिकरणाचा कर्मचारी म्हणून नियुक्त केलेल्या प्रत्येक सेवानिवृत्त कर्मचाऱ्याला, त्याच्या शेवटच्या काढलेल्या मूळ वेतनाच्या २० टक्के इतकी रक्कम मिळेल.

५) सायंकालीन न्यायाधिकरणांच्या अध्यक्षपदी नियुक्ती झालेल्या न्यायिक अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना देय असलेले वेतन, भत्ते किंवा मानधन हे, संबंधित मोटार अपघात दावे न्यायाधिकरणांच्या "वेतन" या शीर्षाखाली प्रदान करण्यात येईल.

९. <u>सायंकालीन न्यायाधिकरणांच्या पीठासीन अधिकाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये</u> :-

या नियमांच्या नियम ४ अन्वये, सायंकालीन न्यायाधिकरणाचा पाठासीन अधिकारी म्हणून नियुक्त केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे, या नियमांच्या नियम ३ मध्ये नमूद केलेल्या प्रकरणांची न्यायचौकशी करण्याचे अधिकार निहित केलेले असतील.

१०. <u>पर्यवेक्षण व नियंत्रण</u> :- अध्यक्ष, उच्च न्यायालयाच्या संपूर्ण नियंत्रणास अधीन राहून, सायंकालीन न्यायाधिकरणाच्या कामकाजाचे पर्यवेक्षण व सनियंत्रण करील.

११. <u>सेवेच्या शर्ती</u> :- या नियमांव्दारे अन्यथा तरतूद केली असेल त्याखेरीज, सायंकालीन न्यायाधिकरणामध्ये काम करण्यासाठी, नियम ४ च्या पोट-नियम (२) अन्वये नियुक्त केलेले सायंकालीन न्यायाधिकरणाचे पीठासीन अधिकारी आणि नियम ५ अन्वये नियुक्त केलेले कर्मचारी यांचे नियमन, शासनाकडून, आदेशव्दारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा शर्तींच्याव्दारे करण्यात येईल :

(९) परंतु, सायंकालीन न्यायाधिकरणाचे काम करण्यासाठी नियम (४) च्या पोट-नियम (२) अन्वये नियुक्त केलेल्या पीठासीन अधिकाऱ्यांच्या आणि नियम ५ अन्वये नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवा, कोणतीही नोटीस न देता व कोणतेही कारण न देता कोणत्याही वेळी, नियुक्ती प्राधिकाऱ्याला समाप्त करता येतील आणि अशा सेवा समाप्तीनंतर, तो, असे पद धारण करण्याचे तात्काळ बंद करील:

परंतु आणखी असे की, अशा सेवा समाप्तीमुळे, त्या व्यक्ती विरुध्द कोणत्याही रीतीने प्रतिकूल परिणाम होणार नाही.

१२. व्यावृत्ती :- अंमलात असलेला कायदा जसा मोटार अपघात दावे न्यायाधिकरणास लागू होईल तसाच तो, या नियमांखाली अधिसूचित केलेल्या सायंकालीन न्यायाधिकरणांना लागू होईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( डॉ. शैलेश कुमार शर्मा )
प्रधान सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन